# प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना

केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक 31.12.2008 रोजी असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम 2008 पारीत केलेला आहे. त्या अनुशंगाने विविध व्यवसाय गट जसे कि बांधकाम कामगार, घरेलु कामगार, फेरीवाले, शेतमजुर, गृहउद्योगातील कामगार, माथाडी कामगार, बिडी कामगार, यंत्रमाग कामगार, आशा वर्कर, आंगणवाडी सेविका यासारख्या विविध 127 व्यवसाय गटातील असंघटीत कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना लागु करण्याबाबतचा निर्णय केंद्रशासनाने घेतला आहे व प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेअंतर्गत दि. 15.02.2019 पासुन नोंदणीचा शुभारंभ करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत सदर योजनेमध्ये अधिकाधिक असंघटीत कामगारांना लाभ मिळावा या उद्देशाने शासनाचे अंगीकृत असलेले माथाडी मंडळ, सुरक्षा रक्षक मंडळ व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या मंडळाअंतर्गत नोंदित कामगारांचे प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेअंतर्गत पहिल्या वर्षाचे अंशदान मंडळामार्फत अदा करण्याबाबत संबंधीत मंडळांना शासनाने निर्देश दिलेले आहेत.

तसेच राज्यातील महिला व बालविकास विभागाअंतर्गत काम करणा-या अंगणवाडी सेविका, आरोग्य विभागाअंतर्गत काम करणा-या आशा वर्कर, ग्राम विकास विभागाअंतर्गत काम करणारे कंत्राटी कर्मचारी, मनरेगा वर्कर यांची विशेष प्राधान्याने योजनेमध्ये नोंदणी करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. योजनेची कार्यप्रणाली व योजनेचे लाभ याबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना राज्यामध्ये अधिकाधिक नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.